ससा सिंहासमोर जाऊन उभा राहिला. शांतपणे त्याने सांगितले.
"महाराज, मी तर सकाळीच यायला निघालो होतो. पण वाटेत मला एक दुसरा सिंह भेटला. अगदी तुमच्या सारखा.
तो मला म्हणाला – "मीच या जंगलाचा राजा. मी तुला मारून खाणार"
मी त्याला खूप समजाविले. पण तो मुळी एकेचना. शेवटी तुम्हाला भेटून परत येण्याचे वचन दिले. म्हणून मला उशीर झाला."
सशाचे बोलणे ऐकून सिंह ओरडला " कुठे आहे तो दुसरा सिंह? चल आत्ता मला दाखव"

---

एक होते जंगल. जंगलातील झाडावर छोटे मोठे पक्षी, माकडे, खारी, कीटक आनंदाने राहत होते. त्या जंगलात एक हत्ती राहत होता. तो आपल्या मोठ्या डोक्याने झाडावर धडका मारायचा. झाडे खाली पडायची. फांद्या तुटायच्या. पक्षी भरारा उडून जायचे. पक्ष्यांची घरटी मोडून जायची. अंडी फुटायची. प्राणी ओरडायचे. छोटे छोटे प्राणी इकडे तिकडे पळायचे. मग दुसऱ्या झाडावर जायचे. सगळ्यांची धावपळ बघून हत्ती जोर जोरात हसायचा.

---

माकड, मांजर, उंदिर आणि खार अशी मित्र मंडळी जमली होती. त्यांनी खीर करायचे ठरविले. सर्वजण सामान आणायला गेले. थोड्या वेळाने सामान आणले व खीर केली. खीरीचा खमंग वास सुटला. खीर गार होई पर्यंत आपण सर्वांनी फिरायला जाऊन येऊ. पण मध्येच मांजर हळूच घरी परत आले आणि. तिने सगळी खीर खावून टाकली आणि पुन्हा फिरायला गेली. सर्वजण फिरून आले. माकडाने खिरीचे भांडे उचलले. पाहतो तो काय? त्यात खीरच नव्हती. इतक्यात मांजर फिरून आले. सगळे म्हणाले "तू खीर खाल्लीस?" मांजर म्हणाले "मी नाही खाल्ली." माकडाने ठरविले की आपण एक युक्ती करूया.

---

जर पाऊस पडला नाही तर काय होईल? झाडे सुकून जातील. गवत उगवणार नाही. शेतात धान्य येणार नाही. नद्या कोरड्या होतील. सरोवरे कोरडी ठक्क पडतील. फळे फुले येणार नाहीत. जंगलातील प्राणि पाणी शोधत रहातील. भाज्या, दूध व सगळेच अन्न महाग होईल. पृथ्वी वरचे हवामान बदलेल. उन्हाळा जास्त त्रासाचा होईल. हिरव्या शेती ऎवजी वाळवंट दिसू लागेल. त्यासाठी आपण काय करायला हवे? दुषित हवा होवू न देणे, झाडे लावणे, कचरा कमी करणे, पाण्याचा कमी वापर करणे ह्या गोष्टी केल्या पाहिजेत.

---